

फार्मागुडी किल्ला जीर्णावस्थेत पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



शुबमन गिल भारताचा नवा कसोटी कर्णधार..! पान ४ वर

वेर्णा, रविवार, २५ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 262 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 25 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### भारतात कोविड रुग्ण वाढ

**नवी दिल्ली, दि. २४ :** कोरोना विषाणूच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेने सर्वांना हादरवून टाकले होते. २०२० मध्ये पहिल्यांदाच त्याची प्रकरणे समोर येऊ लागली आणि त्यानंतर अनेक नवीन व्हेरिएंट समोर आले. त्यानंतर सर्वांना कोविड लसीकरण देखील दिले गेलेत, परंतु ५ वर्षांनंतरही कोविडची प्रकरणे वारंवार समोर येत आलीत. अशातच आता पुन्हा एकदा भारतातील अनेक राज्यांमध्ये कोविडच्या केसेस समोर आल्या आहेत.

यावेळी समोर आलेल्या प्रकरणांमध्ये, कोविड प्रकाराला 'जेएन १' असे नाव देण्यात आले आहे. हा कोविडचा प्रकार जुना असला तरीही आपण सर्वांनी सावधगिरी बाळगणे खूप महत्त्वाचे आहे. विशेषतः ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत आहे किंवा ज्यांना दररोज खूप गर्दी असलेल्या ठिकाणी कामाला जावे लागते अशा लोकांनी काळजी घ्यावी. कोविडच्या धोक्याच्या गांभीर्याबद्दल अद्याप कोणताही इशारा देण्यात आलेला नसला तरी, अलीकडील प्रकरणे पाहता, खबरदारी घेणे महत्वाचे आहे, कारण खोकणे, शिंकणे आणि अगदी हातांनीही हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरतो.

---

### पाकिस्तानला करड्या यादीत टाका!

**नवी दिल्ली, दि. २४ :** मनी लॉड्रिंग रोखण्यात अपयश आल्यामुळे आणि दहशतवादाला अर्थसाह्य करण्याविरोधातील नियमांची पूर्तता करण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्यामुळे पाकिस्तानचा समावेश करड्या यादीत करावा, अशी आग्रही मागणी करण्याचे भारताने ठरवले आहे. आर्थिक कारवाई कृती दलाकडे (फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स किंवा एफएटीएफ) ही मागणी करण्यात येईल, असे सरकारी सूत्रांनी सांगितले.

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूर हल्ल्यानंतर भारत –पाकिस्तान यांच्यात तणाव वाढला आहे. पाकिस्तानला त्याच्या भूमीतून दहशतवाद संपवण्यात अपयश आले आहे. तसेच पाकिस्तान सातत्याने शस्त्रे खरेदी करण्यासाठी विविध व्यवस्थांतील पैसा वळवत आहे, अशी भारताची भूमिका असल्याचेही या सरकारी सूत्राने सांगितले.

जेव्हा एफएटीएफ एखाद्या अधिकारक्षेत्रावर वाढीव देखरेख ठेवते, तेव्हा याचा अर्थ असा होतो, की त्या देशाने मान्य केलेल्या वेळेत ओळखल्या गेलेल्या धोरणात्मक कमतरता जलदगतीने दूर करण्यासाठी वचनबद्धता दर्शवली आहे आणि असा देश वाढीव देखरेखीखाली आहे. एफटीएएफ या संस्थेची बैठक वर्षातून तीनदा होते.

---

### पाकिस्तान तहानलेलाच राहणार?

**नवी दिल्ली, दि. २४ :** जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली होती. भारताने सिंधू जल करार रद्द केला होता. यानंतर पाकिस्तानची मोठी कोंडी झाली आहे. याबाबत आता परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा भारताने घेतलेला निर्णय हा पाकिस्तानने मैत्री आणि सद्भावना यासह कराराच्या तत्त्वांचे उल्लंघन केल्याचा नैसर्गिक परिणाम असल्याचे मिस्त्री म्हणाले.

परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, अभियांत्रिकी तंत्रे, हवामान बदल आणि हिमनद्यांचे वितळणे यासह जमिनीच्या परिस्थितीत बदल झाल्यामुळे कराराच्या अटींवर पुन्हा चर्चा करणे अत्यावश्यक झाले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर करार स्थगित करण्याच्या भारताच्या निर्णयाचे समर्थन करणारे जागतिक राजधान्यांना भेट देणारे शिष्टमंडळ देखील त्याच दिशेने वाटचाल करतील, असे सूत्रांनी सांगितले आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दिलेल्या माहितीनुसार, १९६० च्या कराराच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की हा जल करार सद्भावना आणि मैत्रीच्या भावनेने करण्यात आला आहे. मात्र, पाकिस्तानने ही सर्व तत्वे रद्द केल्याचे मिस्त्री म्हणाले.

# केरळमध्ये दाखल..! गोव्यात लवकरच..!

## ८ दिवस आधीच मान्सूनचे आगमन | 'रेमल' चक्रीवादळाचा परिणाम

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २४ : केरळमध्ये यंदा मान्सून ८ दिवस आधीच दाखल झालाय. या संदर्भात भारतीय हवामान खात्याने अधिकृत घोषणा केली आहे. सामान्यतः १ जून रोजी केरळात मान्सून दाखल होतो. मात्र यंदा २४ मे रोजीच तो दाखल झाल्याने हवामान खात्याचे अंदाजही चुकीचे ठरले आहेत.**



हवामान खात्याच्या माहितीनुसार, यंदा मान्सून केरळसह कर्नाटक व गोव्याच्या सीमेलगतच्या कारवार भागातही दाखल झाला असून, गोव्यात तो १ जूनपूर्वीच पोहोचण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मागील वर्षी मान्सून ८ जून रोजी केरळात दाखल झाला होता. यंदाचा मान्सून २००९ नंतर सर्वांत लवकर पोहोचला असून, त्यावर्षी तो २३ मे रोजी केरळात दाखल झाला होता. १९ मे १९९० ही मान्सूनची गेल्या ५० वर्षांतील सर्वांत लवकर आगमनाची नोंद आहे.

'रेमल' या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे पूर्वोत्तर भारतातही मान्सून यंदा सहा दिवस आधीच पोहोचला आहे. साधारणतः ५ जूनपर्यंत या भागात मान्सून पोहोचतो. यंदा मात्र तो ३० मे पूर्वीच दाखल झाला आहे, अशी नोंद हवामान खात्याने केली आहे.

दक्षिण भारतात मान्सूनचा प्रभाव वाढत असतानाच, उत्तर आणि वायव्य भारतातील राज्ये उष्णतेच्या लाटांशी झुंज देत आहेत. राजस्थान, पंजाब, हरियाणा, जम्मू आणि काश्मीरमध्ये तापमानाने उच्चांक गाठला असून, २७ मेपर्यंत ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. विदर्भ, छत्तीसगड, गंगीय पश्चिम बंगाल, झारखंड आणि बिहारमध्ये ३० मेपर्यंत हलक्या ते मध्यम पावसासह वादळी वाऱ्यांची शक्यता आहे. विशेषतः बिहारमध्ये २५ व २६ मे रोजी ७० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

२७ मे च्या सुमारास पश्चिम–मध्य आणि उत्तर बंगालच्या उपसागरावर एक नवीन कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता असून, यामुळे ओडिशा आणि पूर्वेकडील राज्यांत पावसाचा जोर वाढू शकतो.२४ ते ३० मे दरम्यान ईशान्य भारतात दररोज हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असून, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा येथे काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

गोव्यात मागील काही दिवसांत पावसाच्या हलक्या सरींनी सुरुवात झाली असून, त्यात झाडे पडण्याच्या घटना नोंदवल्या जात आहेत. शनिवारी देखील सत्तरीतील काही भागात झाडे पडल्याने वाहतूक ठप्प झाली होती . मात्र अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी ती बाजूला केली. काणकोण परिसरात दोन दिवसांतील जोरदार पावसामुळे झाडे वीज वाहिन्यांवर कोसळल्याने २२ वीज खांब मोडले, तसेच वीज वाहिन्या तुटून पडल्या. यामुळे राज्य विद्युत विभागाचे सुमारे ६.७ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सहाय्यक अभियंता गोविंद भट यांनी दिली.

उत्तर गोवा जिल्हाधिकारी यशस्विनी बी. आणि दक्षिण गोवा जिल्हाधिकारी एग्ना क्लिटस यांनी राज्यातील सर्व धबधबे, नद्या, तलाव, वापरात नसलेल्या खाणी आणि इतर जलस्रोतांमध्ये पोहणे किंवा प्रवेश करण्यावर पुढील ६० दिवसांसाठी बंदी घातली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत जारी करण्यात आलेल्या या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

या आदेशाच्या पार्श्वभूमीवर, दक्षिण गोवा पोलिस अधीक्षकांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या अहवालात, मागील वर्षी अशा ठिकाणी बुडून मृत्यू झाल्याच्या घटना नोंदवल्या होत्या. त्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने ही खबरदारी घेतली आहे. मान्सून काळात जलस्रोतांमधील पाण्याची पातळी अनपेक्षितपणे वाढू शकते, तसेच प्रवाहाची तीव्रता बदलू शकते, ज्यामुळे बुडण्याचे प्रकार घडू शकतात.

### मान्सून कसा जाहीर होतो?

**भारतात जून ते सप्टेंबर या काळात वारे नैऋत्य दिशेकडून म्हणजे साधारण अरबी समुद्राकडून हिमालयाकडे वाहतात. या वाऱ्यांना नैऋत्य मोसमी वारे किंवा नैऋत्य मान्सून (साऊथ–वेस्ट मान्सून) म्हणून ओळखतात.फक्त पाऊस आला, म्हणजे मान्सूनची सुरुवात झाली, असं नसतं. तर एखाद्या ठिकाणी विशिष्ठ कालावधीतील पावसाचं प्रमाण, वाऱ्याचा वेग आणि तापमानाची स्थिती पाहून हवामान विभागाचे तज्ज्ञ त्या ठिकाणी मान्सून ऑनसेट झाल्याचं म्हणजे मान्सूनची सुरूवात झाल्याचं जाहीर करतात.केरळ आणि लक्षद्वीपमधल्या १४ ठराविक हवामान केंद्रांपैकी किमान ६० टक्के म्हणजे ९ केंद्रांवर ठिकाणी १० मे नंतर कधीही सलग दोन दिवस २.५ मिलीमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली, तर तिथे मान्सून दाखल झाल्याचं हवामान विभाग जाहीर करतो.**

# मडगावमध्ये पुन्हा इमारतीचा भाग कोसळला

▶ **नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. २४ :** मडगाव शहरात जुन्या आणि धोकादायक इमारतींच्या धोक्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. शनिवारी पहाटे सिने लता परिसरातील अंताओ इमारतीचा गॅलरीचा भाग कोसळला. या घटनेच्या काही तासांपूर्वी, शुक्रवारी गांधी मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्यालगत पिंपळकट्टा परिसरात एका जुन्या इमारतीच्या वरच्या मजल्यावरील पॅरापेटचा काही भाग कोसळल्याची घटना घडली होती. सुदैवाने या दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र लागोपाठच्या या दोन्ही घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक रहिवासी विवेक नाईक यांनी अशा घटनांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत, संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. सकाळच्या सुमारास ही दुर्घटना घडल्याने मोठा अनर्थ टळल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. घटनास्थळाजवळ नेहमीच वर्दळ असते; त्यामुळे ही घटना दुपारी किंवा संध्याकाळी घडली असती, तर मोठा अपघात घडला असता, अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

शॅडो कौन्सिल फॉर मडगावचे संयोजक सॅव्हियो कुतिन्हो यांनी या संदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित केला. त्यांनी विचारले की, रिअल इस्टेट डेव्हलपर्स या धोकादायक इमारती कोसळण्याची वाट पाहत आहेत का, जेणेकरून त्यांना त्या परिसरात पुनर्विकासाची संधी मिळेल?

घटनास्थळी नगरविकास खात्याचे अधिकारी आणि पोलिसांनी तत्काळ धाव घेतली. त्यानंतर मडगावचे आमदार दिगंबर कामत यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले की, अशा असुरक्षित इमारतींच्या निष्कासनासाठी योग्य साधनसंपत्ती असलेल्या कंत्राटदाराची नियुक्ती तात्काळ करावी.शासनाकडे किंवा मडगाव नगरपरिषदेकडे अशा कामांसाठी आवश्यक मनुष्यबळ किंवा यंत्रसामग्री नाही. त्यामुळे खासगी कंत्राटदाराच्या माध्यमातून कार्यवाही करणे हेच योग्य ठरेल, असे कामत यांनी स्पष्ट केले. त्यांनी यापूर्वी शुक्रवारी घडलेल्या घटनेबाबतही अशाच सूचना प्रशासनाला दिल्या होत्या.

पान २ ▶

# कळंगुट–बागा एफडीएच्या रडारवर !

■ *टीम दैनिक हेराल्ड*

▶ **पुढील दोन आठवडे कठोर कारवाईची तयारी**

कळंगुट, दि. २४ : नवीन वर्षाच्या प्रारंभापासून अन्न व औषध प्रशासन (एफडीए) कळंगुट परिसरात सातत्याने छापे टाकत असतानाही अनेक रेस्टॉरंट्स आणि अन्नविक्रेते नियमांचे उल्लंघन करत असल्याचे आढळून आले आहे. यामुळे पुढील दोन आठवड्यांत कळंगुट–बागा परिसरावर विशेष लक्ष केंद्रित करून कठोर तपासणी मोहीम राबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

एफडीएचे वरिष्ठ निरीक्षक रिचर्ड नोरोन्हा यांनी सांगितले की, आम्ही येत्या दोन आठवड्यांत कळंगुट आणि बागा परिसरातील सर्व अन्न विक्रेत्यांची तपासणी करून आवश्यक ती कारवाई करू. नियमांचे उल्लंघन सहन केले जाणार नाही. २०२५च्या सुरुवातीपासून निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर एफडीएने कळंगुट परिसरात विशेष देखरेख मोहीम सुरू केली आहे. या कालावधीत विविध छाप्यांमध्ये एफडीएने मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे काजू जप्त केले असून, अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अनेक रेस्टॉरंट्स व दुकाने तात्काळ बंद करण्यात आली आहेत. काहींवर आर्थिक दंडही लादण्यात आले आहे.

गेल्या आठवड्यात एफडीएने दोन ठिकाणी छापे टाकून सुमारे १० रेस्टॉरंट्स आणि स्वयंपाकगृहे बंद केली. ही ठिकाणे अत्यंत अस्वच्छ स्थितीत बिर्याणी आणि मोमोज तयार करत असल्याचे निष्पन्न झाले. यामुळे ग्राहकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. विशेषतः कळंगुट समुद्रकिनाऱ्यावरील 'हैदराबादी बिर्याणी' नावाच्या एका रेस्टॉरंटमध्ये चिकनचे तुकडे टॉयलेट क्लीनर मिसळलेल्या पाण्यात धुतले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.

रेस्टॉरंट्स व्यतिरिक्त, एफडीएने काजू व मिठाई विक्री करणाऱ्या किरकोळ दुकानदारांचीही तपासणी सुरू केली आहे. यामध्ये चॉकलेटच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या 'चॉकलेट ॲनालॉग' उत्पादने जप्त करण्यात आली आहेत. ही उत्पादने चॉकलेट नसून वनस्पती चरबीपासून तयार केलेली मिठाई आहे. चुकीच्या लेबलिंगमुळे ती ग्राहकांची फसवणूक करत आहेत, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

एफडीएने यापूर्वी संबंधित पुरवठादारांना साठा मागे घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, अनेक किरकोळ दुकानदारांकडून त्यांची विक्री अद्याप सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पुढील दोन आठवड्यांत संपूर्ण कळंगुट–बागा परिसरात पुन्हा एकदा व्यापक तपासणी केली जाणार असल्याचे नोरोन्हा यांनी स्पष्ट केले. तपासणी दरम्यान, महाराष्ट्रातील एका उत्पादकाकडून अनिवार्य एफएसएसएआय परवाना नसतानाही वितरित करण्यात येणाऱ्या मिनरल वॉटरच्या बाटल्या साठवणाऱ्या एका दुकानावरही कारवाई करत त्यास बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

मंगळवारी एका किरकोळ काजू विक्रेत्यावर कारवाई करत सुमारे ५० किलो निकृष्ट दर्जाचे काजू एफडीएने जप्त केले. त्या दुकानाला तत्काळ विक्री थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या तपासणी मोहिमेत एफडीएचे निरीक्षक रिचर्ड नोरोन्हा, राजाराम पाटील, अमित मांद्रेकर आणि नौसिन मुल्ला सहभागी होते. प्रशासनाने सर्व अन्न व्यवसायिकांना अन्नसुरक्षा नियमांचे पालन करण्याचे स्पष्ट आदेश दिले असून, नियमभंग आढळल्यास कठोर कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे.

# 'म्हैसूर पाक'चे नाव 'म्हैसूर श्री' होणार ?

## 'पाक' शब्दाभोवती नवा वाद | पारंपरिक मिठाईच्या नावाभोवती उठले वादळ

जयपूर, दि. २४ :

भारत–पाकिस्तान दरम्यान नव्याने उफाळलेल्या तणावाचा प्रभाव सामाजिक माध्यमांपासून बाजारपेठेपर्यंत सर्वत्र जाणवू लागला असून त्याच्या छायेत आता पारंपरिक गोड पदार्थांचा म्हैसूर पाक' विवादाच्या केंद्रस्थानी आला आहे.

राजस्थानाच्या राजधानीत असलेल्या एका प्रसिद्ध हलवाई दुकानाने म्हैसूर पाक'चे फलक उतरवून त्यावर म्हैसूर श्री' असे नाव लावल्याची बातमी मंगळवारी काही स्थानिक वृत्तमाध्यमांनी प्रसारित केली. त्यानंतर सोशल मीडियावर हॅशटॅग' म्हैसूर पाक ' ट्रेंड होत विविध प्रतिक्रिया उमटल्या. काही नेटिझन्सनी पाक'ऐवजी इंडिया' जोडा'' अशी मागणी केली; तर काहींनी हे अनावश्यक राष्ट्रवाद'' असल्याची टीका केली.

तत्पूर्वी 'मोती पाक' या दुसऱ्या पारंपरिक मिठाईचेही नाव 'मोती श्री' करण्यात आल्याचा दावा व्हायरल झाला होता. दोन्ही प्रकरणांचा मूळ स्त्रोत पाक' या शब्दात असल्याचे दिसते; कारण तो कधी कधी पाकिस्तानसाठी लघुरूप म्हणून वापरला जातो.



'म्हैसूर पाक'चा उगम १९व्या शतकाच्या उत्तरार्धात, मैसूरचे महाराज नलवाडी कृष्णराज वोडेयार यांचे राजभोजनालयातील स्वयंपाकी काकासूर मडप्पा यांच्यापाशी सापडतो. बेसन, साखरेचा पाक आणि तुपाच्या समन्वयातून घाईगडबडीत घडलेली ही कृती महाराजांच्या पसंतीस उतरल्यानंतर म्हैसूर पाक' या नावाने प्रचलित झाली. कन्नडमध्ये साखरेच्या घट्ट पाकाला पाका' अशी संज्ञा आहे; पुढे अ'चा उच्चार 'गळून पाक' अशी रूढ रूप धारण झाली.

मडप्पा यांचे वंशज आजही म्हैसूरमधील अशोक रोडवर मूळ पद्धतीने ही मिठाई तयार करतात. पारंपरिक पद्धतीने बनविलेला हाच 'म्हैसूर पाक' दक्षिण भारतातील लग्नसमारंभ, गोधभराई व उत्सवांमध्ये अनिवार्य मानला जातो.

भाषातज्ज्ञ प्रा. अजित वडनेरकर यांच्यानुसार 'पाक' हा शब्द संस्कृतमधील 'पाक' (शुद्ध, पवित्र) व फारसीतील 'पाक' या उभय अर्थांनी भारतीय भाषांमध्ये रूढ झाला आहे. हिंदीत याचे शिजवलेले' व 'निर्मळ' असे दुहेरी अर्थ आहेत. पाक'मध्ये दोषरहितपणा व पावित्र्याची भावना प्रतिध्वनित होते, असे ते स्पष्ट करतात.

चीनविरोधी भावनांनी २०२० मध्ये चिनी उत्पादनांवरील बहिष्काराला चालना दिली होती; त्याच पठडीत भारत–पाक तनावाच्या पार्श्वभूमीवर 'पाक' शब्द असलेल्या उत्पादनांना नकार देण्याचा टोकाचा सूर पुन्हा समोर आला आहे. तथापि, खाद्यपरंपरेचा राजकीय भूमिकांसाठी वापर योग्य आहे का, असा प्रश्नही तितक्याच तीव्रतेने उपस्थित केला जात आहे.

विवादग्रस्त जयपूर–स्थित दुकानाने अद्याप औपचारिक निवेदन दिलेले नाही. मात्र, दुकानातील कर्मचारी नावे बदलण्याचा कोणताही अधिकृत आदेश न आल्याचे सांगत आहेत. प्रशासनाकडूनही या वृत्ताची खातरजमा सुरू असून नावबदलाचा निर्णय व्यावसायिक की राजकीय याचा शोध घेतला जात आहे. सध्यातरी 'म्हैसूर पाक'चे नाव बदलण्याचा कोणताही व्यापक निर्णय नाही; तरीही सोशल मीडियावरचा वाद पाहता गोडी–गुलाबीचा हा राजदूत' भविष्यात आणखी चर्चेचा विषय ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, खाद्यसंस्कृती हे सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असल्याने तिचे राजकीय लेबलिंग टाळण्याची मागणी तज्ज्ञांकडून जोर धरू लागली आहे.

# रॅगिंग प्रकरणात निष्पक्ष चौकशीची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २४ :** गोवा सरकारी कर्मचारी संघटनेचे माजी अध्यक्ष जॉन नाझरेथ यांनी शनिवारी आर्किटेक्चर महाविद्यालयात घडलेल्या रॅगिंगच्या प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायाधीश किंवा निवृत्त पोलिस अधीक्षक यांच्या मार्फत करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

नाझरेथ यांनी आरोप केला की, गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी रॅगिंगच्या संदर्भात तक्रार दिली असूनही, कॉलेज प्रशासन या प्रकरणाकडे दुर्लक्ष करत आहे. उलट, संबंधित विद्यार्थ्यांवर लेखी स्वरूपात तक्रारीचा पाठपुरावा न करण्याचा दबाव आणण्यात येत आहे.

पणजीतील एका खासगी हॉलमध्ये आयोजित फ्रेशर्स पार्टीदरम्यान ही रॅगिंगची घटना घडली होती. याप्रकरणी २४ विद्यार्थ्यांनी तक्रार दाखल केली होती. मात्र, वरिष्ठ विद्यार्थ्यांवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. परिणामी, या विद्यार्थ्यांनी दबावाखाली तक्रार मागे घेतली, आणि त्यानंतर चौकशी थांबवण्यात आली, असा आरोप नाझरेथ यांनी केला.

नाझरेथ यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव टाकण्यात आला आणि त्यांनाच त्रास दिला गेला. ही बाब ते समोर आल्यानंतरच उघडकीस आली. इतकेच नव्हे, तर फ्रेशर्स पार्टीला उपस्थित असलेल्या एका अभ्यागत प्राध्यापकाला, विद्यार्थ्यांनी कामकाजावर आक्षेप घेतल्याने, राजीनामा देण्यास सांगण्यात आले.

तसेच, महाविद्यालयीन प्रशासन सध्या या घटनेला 'खाजगी पार्टी' म्हणून संबोधून संस्थात्मक जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. हेराल्ड मिडियाने हे प्रकरण उघडकीस आणल्यानंतरच विद्यार्थ्यांवर दबाव आणण्याचे प्रकार सुरु झाले असल्याचे नाझरेथ यांनी स्पष्ट केले.

पान २ ▶